# EX.5 Arguments

Exh. 23

२१हजा पोवार पि.अहिल्याबाई पोवार, ९५.

रे.क.नं.२०/२०२६

**दावा मिळकत - सोनाळी, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील भूमापन गट क्र.४२४ क्षेत्र ३३.७० चौ.मी. हे दगड विटा मातीचे घर होते.**

Order
Seen
C.J.J.D.,Kagal.
Date : 27/04/2026

सदरची घर मिळकत ही २ बहिणी व २ भाऊ यांचे नावावर मिळकत पत्रिकेत प्रत्येकी ६.७४ चौ.मी. मालकी हक्कात आहे.

दि.०४.११.२०२५ इ.रोजी चंद्रकांत संतु पोवार यांची ए.कु.पु.म्हणून नोंद कमी करुन मिळकत धारक म्हणून यातील वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ यांची नावे लावणेत आली.

वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ व बहिणी आहेत.

चंद्रकांत संतु पोवार यांचे दि.९.०३.२०१६ इ.रोजी निधन झाले आहे.

सदरचे घर हे प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी वादी अगर इतर कोणाचीही किंवा सरपंच/ ग्रामसेवक यांचे परवानगी न घेता पाडलेले आहे.

प्रतिवादी नं.१ ते ४ हे गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत.

प्रतिवादी नं.१ ते ४ हे वादीस आपले वडिलार्जित मालकी हक्काचे घरातील कायदेशीर मिळणारे हिश्यापासून बेदखल करीत आहेत.

दि.28/2/26 इ.रोजी प्र.वादींनी वादीवर हल्ला केला, त्याची फिर्याद पो.ठाणेत दाखल केली आहे. त्यानंतर प्रतिवादी हेकेखोर असलेने ऐकत नाहीत.

प्रतिवादी हे स्वार्थी भावनेने वादीचे हिश्यास येणारे घर मिळकतीतील १/४ हिस्सा डावलून व घर पाडून नविन घर बांधत आहेत.

असे जर बेकायदेशीरपणे बहिण व सख्खे भाऊ यांचा घरातील हिस्सा एका सख्या भावास डावलून प्रतिवादी जर दांडगाव्याने बांधत असतील तर वादीचे अतिशय नुकसान होणारे आहे व प्रतिवादीचे हे कृत्य बेकायदेशीर आहे.

यातील प्रतिवादीचे म्हणणे असे आहे की, ऑक्टोंबर २०२५ पासून प्र.वादी बांधकाम सुरु करणार असलेचे वादींना माहिती आहे हे खोटे आहे. कारण प्र.वादींनी कोणासही न सांगता अगर वादींची किंवा ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच यांची लेखी परवानगी न घेता घर पाडले आहे ही बाब बेकायदेशीर आहे.

यातील मिळकत पत्रिका दि.९.०२.२०२६ चे अवलोकन केले असता नगर भुमापन गट नं.४२४, क्षेत्र ३३.७० चौ.मी. हे वादी व प्रतिवादी यांचे समाईक मालकीचे घर मिळकत आहे असे दिसते.

सदरचे प्रतिवादी मयत चंद्रकांत संतराम पोवार यांची पत्नी पुष्पा ही वेडसर आहे. म्हणून त्यांना प्रतिवादी करणेत आलेले नाही. आणि म्हणून त्यांचे मुलास प्रतिवादी नं.४ नमुद केले आहे.

परिच्छेद नं.५ मध्ये प्रतिवादींनी सदरचे घर हे १९८२ साली संतराम तुकाराम पोवार यांचे नांवे होते. व ते दि.९.०३.२०१६ रोजी चंद्रकांत संतु पोवार हे मयत झाले. दि.४.११.२०२५ इ.रोजी मिळकत पत्रिकेस नांवे लागली आहेत. प्रतिवादींनी कबुल व मान्य केले आहे. याचाच अर्थ सदरचे घर हे वादी व प्रतिवादी नं.१ ते ४ यांचे समाईक वडिलार्जित व समाईक मालकीचे घर आहे हे प्रतिवादींना मान्य आहे.

दि.४.११.२०२५ ते दि.११.०२.२०२६ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ३ महिने प्र.वादींनी कोठेही घर बांधणे बाबत वादींशी अगर ग्रामसेवक / सरपंच, सोनाळी, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचेकडे लेखी परवानगी मागितलेली नाही किंवा तसे रेकॉर्डवर काही नाही.

**प्र.वादीचे म्हणणे नुसार सन १९९५ मध्ये सर्व मिळकतीच्या तोंडी वाटण्या वादी व प्रतिवादी यांचेत झालेत असे म्हणणे आहे. पण तोंडी वाटप्यांना न्याय संस्थेत कायदेशीर महत्व नाही.**

प्र.वादी नं.१ यांना ४२४ ही घर मिळकत ही तोडी वाटणीत दिलेली होती याला कायदेशीर लेखी पुरावा या रेकॉर्डवर नाही व ते घर वादी व प्रतिवादी यांचे **मिळकत पत्रिकेस समाईक चौघांचे नांवची मिळकत आहे**. त्यामुळे एका कोणाची मालकीची सदर घर मिळकत आहे असे म्हणता येत नाही.

समाईक घर प्र.वादी नं.१ ने पाडलेले आहे हे वादी व प्रतिवादी यांचे मालकीचे मिळकत पत्रिकेनुसार असलेले घर पाडण्याचे अधिकार प्र.वादी नं.१ यांना कोणत्या कायद्याने? कोणी दिले? हे रेकॉर्डवर काही नाही. हा यातील प्र.वादी नं.१ ते ४ यांचा मनमानी कारभार आहे हे स्पष्टपणे दिसते. अन्यथ वादी व प्रतिवादी यांनी संगणमताने ठरवून ते

घर नुतनीकरण एकमेकांचे अनुमताने व ग्रामपंचायत ग्रामसेवक/ सरंपच यांची परवानगी घेऊन केले असते. याचा अर्थ प्र.वादी हे कोणालाही जुमानत नाहीत, ते कायदा मानत नाहीत हे स्पष्ट दिसते.

समाईक भाऊ व बहिण यांचे मालकीचे वडिलार्जित घर हे प्रतिवादींनी वादींना अंधारात ठेवून, कायदा धाब्यावर बसवून, मनमानी पणाने व दांडगाव्याने पाडलेले आहे हे कृत्य बेकायदेशीर आहे. यास कायद्याने बांधणेस मान्यता देणेत येत नाही. कारण तशी परवानगी दिली तर मुळातच बेकायदेशीर कृत्यास खतपाणी घातल्याप्रमाणे होईल व वादींवर अन्याय होईल.

समाईक घर पाडणे करीता वादींची कोठेही कधीही परवानगी नव्हती व नाही.

समाईक घर मिळकत प्र.वादी नं.१ यांना एकटयांना कब्जेत कोणी दिली त्याची कब्जेपट्टी किंवा तसा मालकी संबंधी स्वतंत्र पुरावा रेकॉर्डवर नाही.

प्र.वादी नं.१ हया देवदासी आहेत. त्यांचे गावंधर येथे घर नं.६९५ या ठिकाणी देवदासी म्हणून घर बांधुन त्यांना सरकारने दिले आहे व त्या अंगणवाडी सेविका म्हणून सरकारी नोकरीस आहेत. त्यांचा दाखला व घराचे फोटो या सोबत आहेत. प्र.वादी नं.१ हया श्रीमंत आहेत. त्यामुळेच त्यांनी हे बेकायदेशीर कृत्य केले आहे.

घर जिर्ण झाले होते हे प्र.वादीचे म्हणणे खोटे आहे. कारण घर जिर्ण होते तर सर्वानुमते व सर्वांचे विचाराने का पाडले नाही? यास प्र.वादी नं.१ ते ४ यांचेकडे उत्तर नाही व असेल तर ते रेकॉर्डवर नाही.

समाईक मालकीचे घर मिळकतीत प्र.वादी नं.१ ते ४ यांची शांततामय कब्जेवहिवाट होती असे म्हणणे खोटे आहे. कारण समाईक घर हे वादीचे नाव मिळकत पत्रिकेस असतांना वादी सुध्दा त्याचे कायदेशीर मालक आहेत.

हे घर पुर्नबांधणी करणेबाबत वादी व प्रतिवादी यांची कधीही चर्चा लेखी अगर तोंडी झालेली नाही. तसे असते तर वादींना हा दावा करणेचे कारणच नव्हते. व न्यायालयात प्र.वादी नं.१ ते ४ यांचे विरुध्द दाद मागणेचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

या दावेचे सोबत वादातीत घर मिळकत अस्तित्वात होती त्यावेळी व घर प्र.वादी नं.१ ते ४ यांनी पाडले नंतरचे फोटो न्यायालयात रेकॉर्डवर हजर केले आहेत, ते खोटे आहेत असे म्हणता येत नाही. व घर बांधकाम न करणे बाबत मे.न्यायाधिशांचे समोर प्र.वादी यांनी कबुल करुन नंतर खोटे बोलून व मे.कोर्टाची दिशाभूल करुन पाडलेले घर मनमानी पध्दतीने तसेच या घराचे बाबतची बाब न्यायप्रविष्ठ असताना व न्यायालयाचा कोणताही आदेश नसताना न्यायालयाची दिशाभूल करुन बेकायदेशीरपणे घर बांधकाम प्र.वादी हे करीत होते.

वादींची मनाईची मागणी ही योग्य व कायदेशीर आहे. कारण प्र.वादी हे मनमानी पध्दतीने घर बांधकाम करीत आहेत. सदरचे घर मिळकत ही वादी व प्र.वादी यांची समाईक मालकीची आहे. त्यामुळे या दावेचे कामी **प्र.वादी नं.१ ते ४ यांना स्टेटस्को किंवा मनाई आदेश झाले शिवाय त्यांना कायद्याचे महत्व समजणार नाही.**

वादी व प्रतिवादी हे सख्खे बहिण व भाऊ आहेत व त्यांची समाईक मालकीची घर मिळकत आहे. ते कोणा एका मिळकत धारकास

डावलून स्वार्थी भावनेने नुतणीकरण करता येणार नाही. अन्यथा तसे झाले तर हे त्यांचे बेकायदेशीर कृत्य होईल.

त्यामुळे वादींनी केलेला मनाईचा दावा हा सत्य घटनेवर व सद्य परिस्थितीशी निगडीत असलेने दावा योग्य स्वरुपात दाखल केला असलेने वादींना या कामी न्याय मिळणे हे न्यायाचे दृष्टीने योग्य आहे.

यातील वादी व प्र.वादी नं.१ ते ३ हे सख्खे बहिण व भाऊ असलेने वादींनी दयाळुपणे व नम्रपणे प्र.वादींना दावा आपसात तडजोड करणे बाबत खालीलप्रमाणे मुद्दे प्र.वादी नं.१ ते ४ यांचेकडे मांडले ते मुद्दे खालीलप्रमाणे :-

१) वादी ही घर पाडलेली जागा प्र.वादींचेकडून खरेदी करणेस तयार आहेत.

२) वादी हे प्र.वादी नं.१ अहिल्याबाई संतू उर्फ संतराम पोवार हीस दोन मजली घर स्वखर्चाने बांधून देणेस तयार आहेत, एक मजल्यावर प्र.वादी नं.१ राहतील व २रे मजल्यावर वादी राहतील.

३) तसेच प्र.वादी नं.१ जर का तळ मजल्याचा बांधकाम खर्च करीत असतील तर **वादी** दुसऱ्या मजल्याचे बांधकाम खर्च करणेस तयार आहे.

४) वादी हे प्र.वादी नं.१ ते ४ यांना या वादातीत घराचे जागेचे मोबदल्यात २ ते ३ गुंठे शेतजमिन देणेस तयार आहेत.

५) अन्यथा प्र.वादी यांनी वादी यांना ४ गुंठे शेतजमीन द्यावी त्या मोबदल्यात वादी आपला हक्क सोडणेस तयार आहेत.

६) या वदातीत घराची आता पाडलेनंतर रिकामी जागा झाली आहे. त्यातील वादींचे वाटणीचा १/४ हिस्सा प्र.वादींनी सोडून प्र.वादींनी नविन घर बांधणेस वादीची परवानगी आहे.

वरील सर्व १ ते ६ बाबी प्र.वादींचे बरोबर वादींनी चर्चा करुन आपसात तडजोड करणेस प्र.वादी नं.१ ते ४ हे तयार आहेत काय पाहीले आहे. त्यांना ४ ते ५ दिवसांचा कालावधी दिला होता. पण प्र.वादी नं.१ ते ४ हे वादींना तडजोडीसाठी तयार नाहीत व स्वार्थी भावनेने वादींना वडिलार्जीत घर मिळकतीमधून हकलणेच्या प्रयत्नात व वादींना बेदखल करणेच्या व वादींचा कायदेशीर हक्क डावलणेच्या प्रयत्नात आहेत. तसे झाले तर वादींचेवर ते अन्यायकारक कृत्य होईल व ते बेकायदेशीर होणार आहे. म्हणुन वादींना न्याय मिळावा या करीता या न्यायालयात प्र.वादी नं.१ ते ४ यांचेविरुध्द मनाईचा दावा दाखल केला आहे.

प्र.वादी नं.१ यांना राहणेकरीता गावंधर, सोनाळी, ता.कागल, जि.कोल्हापूर या ठिकाणी देवदासी असलेने सरकारने घर बांधुन दिले आहे. त्यामुळे प्र.वादी नं.१ यांना राहणेस घर नाही वगैरे प्र.वादी नं.१ व ३ यांचे म्हणणे खोटे व लबाडीचे आहे.

प्र.वादी नं.१ ते ४ यांनी वादींवर दि.28/2/26 इ.रोजी अंगावर जावून, हल्ला केला. त्यानंतर वादी यांनी मुरगुड पो. ठाणेत प्र.वादी नं.१ ते ४ यांनी यांचेविरुध्द तक्रार दाखल केली आहे.

**प्रतिवादी नं.२ व ४ यांना दावा मान्य व कबुल आहे. म्हणून त्यांनी कोणत्याही स्वरुपाचे म्हणणे या दावे बाबत दिलेले नाही.**

प्रतिवादी नं.३ हया अंगणवाडी सेविका आहेत व त्या म्हाळुंगे येथे राहतात. वादींच्या त्या सख्ख्या बहिण आहेत.

प्र.वादी नं.१ ते ४ यांच्या बेकायदेशीर कृत्यामुळे वादी यांचे अतिशय शारिरीक व मानसिक व आर्थिक नुकसान होत आहे. त्याकरीता प्र.वादी नं.१ ते ४ यांचेवर र.रु.५०,०००/- **कॉम्पेन्सेटरी कॉस्ट** बसविणेत यावी.

सदरच्या सत्य घटनेमुळे वादींना हा दावा प्र.वादी नं.१ ते ४ यांचे विरुध्द मनाईचा दावा या कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

प्र.वादी नं.१ ते ४ हे भांडखोर गुंड तसेच कायद्यास न जुमानणारे लोक आहेत. त्यामुळे यानंतरही वादींचे जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो किंवा भविष्यात मोठा अनर्थ होणेची शक्यता नाकारता येत नाही.

तरी प्र.वादी नं.१ ते ४ यांना सोनाळी नगर भुमापन गट नं.४२४ क्षेत्र ३३.७० चौ.मी. चे दगड, विट, मातीचे बांधलेले वडिलार्जित घर हया दावा मिळकतीचे बेकायदेशीरपणे घर पाडले आहे. **तेव्हा त्या घराचे रिकामे घराचे जागेवर काहीही बांधकाम करु नये किंवा बदल करणेत येऊ नये अशी तुर्तातुर्त मनाई आदेश व्हावा अन्यथा सदरच्या दावेच्या निकालापावेतो "जैसे थे" (Statuesque) असा आदेश व्हावा ही विनंती.**

म्हणून दिल्या लेखी तक्रारी.

**दिनांक : ३०.०३.२०२६**

**(सुनिल श्रीकांत बाबर)**
**ॲडव्होकेट**

**वादी.**

सुनिल श्रीकांत बाबर
ॲडव्होकेट
रा.फ्लॅट नं.३०२, अनुप्रित अपार्टमेंट, पुष्पाली प्राजक्त शेजारी, दुधाळी, रंकाळा टॉवर, कोल्हापूर.मो.7517521771

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.27 17:38:40 +0530